# श्री. अक्षत खेतान यांच्यातर्फे भविष्य व त्याचे क्रांतीकारी परिणाम अधोरेखित

पुणे : ईटी लीगल आणि फायनान्स कॉनक्लेव्ह 2024 या आर्थिक आणि कायदा क्षेत्रातील महत्त्वाच्या कार्यक्रमाचे आज मुंबईत आयोजन करण्यात आले होते. या कॉनक्लेव्हमध्ये या क्षेत्रातील आघाडीचे लीडर्स, तज्ञ आणि भागधारकांनी वित्त आणि कायदा क्षेत्रातील महत्त्वाच्या विषयांवर चर्चा केली. या चर्चेत इनसॉल्व्हन्सी आणि बँकक्रप्टसी कोडवर (आयबीसी) मुख्य भर देण्यात आला. आघाडीच्या वक्त्यांमध्ये एयू कॉर्पोरेट अॅडव्हायजरी आणि लीगल सर्व्हिसेसचे श्री. अक्षत खेतान यांचा समावेश होता. त्यांनी सध्याची परिस्थिती आणि आयबीसीचे भविष्यातील परिणाम याविषयी मौल्यवान माहिती दिली. श्री. खेतान यांनी आयबीसीचा इनसॉल्व्हन्सी फ्रेमवर्कवर आयबीसीचा कशाप्रकारे क्रांतीकारी परिणाम होऊ शकतो हे अधोरेखित करत निवारण प्रक्रिया सुरळीत करण्यात आयबीसीची भूमिका किती महत्त्वाची आहे हे सांगितले. स्थापनेपासूनच आयबीसीने दिवाळखोरीचे निवारण करण्यासाठी लागणारा वेळ मोठ्या प्रमाणावर कमी केल्याचे आणि त्यामुळे भारतात व्यवसाय करणे सोपे झाल्याचे सांगितले. यामध्ये येणाऱ्या आव्हानांविषयी श्री. खेतान म्हणाले, की आयबीसीमुळे मोठ्या प्रमाणावर सकारात्मक बदल झाले असून अद्याप त्यात जास्त सफाईदारपणा आणणे गरजेचे आहे. दिवाळखोरीच्या उदाहरणांमधली गुंतागुंत सोडवण्यासाठी सातत्यपूर्ण बदल आणि न्यायिक व्याख्या आवश्यक असल्याचेही त्यांनी सुचवले. अशाप्रकारच्या केसेस वाढत असून त्या हाताळण्यासाठी नॅशनल कंपनी लॉ ट्रिब्युनलची (एनसीएलटी) क्षमता व पायाभूत सुविधा बळकट करणे महत्त्वाचे असल्याकडेही त्यांनी लक्ष वेधले. श्री. खेतान यांनी आपल्या भाषणातून धोरणकर्ते, रेग्युलेटर्स आणि या क्षेत्रात काम करणाऱ्यांनी एकत्रितपणे आयबीसीच्या यशासाठी काम करायला हवे हे लक्षात आणून दिले. दमदार आर्थिक वातावरणासाठी कर्जदार आणि कर्जपुरवठादार या दोघांचे रक्षण करणाऱ्या, अधिक समतोल फ्रेमवर्क गरजेची असल्याचे सांगत त्यांनी सांगता केली. ईटी लीगल आणि फायनान्स कॉनक्लेव्ह 2024 मुळे गंभीर चर्चेसाठी व्यासपीठ मिळाले आणि श्री. अक्षत खेतान यांनी दिलेले योगदान इनसॉल्व्हन्सी आणि बँकक्रप्टसी कोडचे महत्त्वाचे पैलू उलगडण्यास लाभदायक ठरले व त्यातून भारताच्या आर्थिक यंत्रणेतील त्याचे महत्त्व अधोरेखित झाले.